॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

बोलण्यापूर्वी विचार करा
आणि करण्यापूर्वी नियोजन करा.

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ११५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

SPOT NEWS

मुंबईत सीएनजी महागला; प्रतिकिलो १ रुपयाची वाढ

● **मुंबई** – मुंबई आणि आसपासच्या परिसरातील वाहनधारकांना महागाईचा आणखी एक फटका बसला आहे. महानगर गॅस लिमिटेडने सीएनजीच्या दरात प्रतिकिलो १ रुपयाने वाढ केली आहे. या दरवाढीमुळे मुंबईत आता सीएनजीचा नवीन दर ९० रुपये प्रतिकिलो झाला असून, हे सुधारित दर ३१ ऑक्टोबर २०२६ च्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले आहेत. यापूर्वी मुंबईत सीएनजीचा दर ८९ रुपये प्रति किलो होता, तो आता ९० रुपये झाला आहे. गेल्या काही महिन्यांत सातत्याने होणाऱ्या या दरवाढीमुळे मुंबईतील लाखो रिक्षा, टॅक्सी, बेस्ट बसेस आणि सीएनजी कार वापरणाऱ्या सर्वसामान्य वाहनधारकांचे आर्थिक बजेट कोलमडणार आहे. या ताज्या दरवाढीनंतर आता स्थानिक रिक्षा आणि टॅक्सी संघटनांकडून भाडेवाढीची मागणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महानगर गॅस लिमिटेडने दिलेल्या माहितीनुसार, मध्य-पूर्व देशांतील संकटामुळे गॅस खरेदीचा खर्च कमालीचा वाढला आहे. त्यातच देशांतर्गत गॅस वाटपात घट झाल्याने कंपनीला महागड्या आयात गॅसवर अधिक अवलंबून राहावे लागत आहे. हा अतिरिक्त आर्थिक बोजा अंशत: कमी करण्यासाठीच ही दरवाढ करण्यात आली असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

नोव्हेंबरमध्येही उन्हाचा प्रकोप?

● **मुंबई** – ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्रातील बहुतांश भागात उन्हाच्या तीव्र झळांचा सामना नागरिकांना करावा लागला. दरम्यान, प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीची तीव्रता पुढील काही दिवसात वाढण्याची शक्यता असून हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, हिमालयाच्या लगतचे काही भाग वगळता देशाच्या बहुतांश भागात नोव्हेंबर महिन्यात कमाल तापमान सरासरीहून अधिक राहण्याची शक्यता आहे. यात सर्वाधिक फटका गुजरात आणि राजस्थान या राज्यांना बसण्याची शक्यता असून महाराष्ट्रातील काही भागांसह देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदेशांना उष्णतेचा तडाखा सहन करावा लागेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यंदा देशातील बहुतांश भागात सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली. तसेच मान्सूनने लवकरच माघार घेतल्याने अनेक भागात ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून उकाड्यात वाढ झाली आहे. त्यामुळे हिवाळा ऋतू केव्हा सुरु होतो याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा बँकेच्या १० जागांसाठी आज मतदान

खासदार, आमदारांसह अन्य नेत्यांची आज कसोटी । उद्या मतमोजणी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आज, सोमवार (दि. २) रोजी १० जागेसाठी मतदान होत आहे. या अगोदर ११ जागा बिनविरोध निवडून आल्या असून उर्वरित १० जागेसाठी २७ उमेदवार आपले नशिब आजमावत आहेत. बिनविरोधचा फार्स ठरल्यानंतर विखे-थोरात गटाविरोधात लंके-लोखंडे यांनी उमेदवार दिल्याने निवडणूक चुरशीची बनली आहे. आजी-माजी मंत्र्यांच्या गटाविरोधात आजी-माजी खासदारांचे पॅनल अशी १० जागेसाठी लढत होत असून दोन्ही गटाने ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे.

आज होणाऱ्या मतदानात अकोले सोसायटी मतदारसंघातून विद्यमान आ. डॉ. किरण लहामटे विरोधात सिताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे, राहुरी सोसायटी मतदारसंघात आ. प्राजक्त तनपुरे विरोधात माजी आ. चंद्रशेखर कदम यांचे चिरंजीव सत्यजित कदम, शेतीपूरक व शेतमाल सहकारी संस्था मतदारसंघात आ. आशुतोष काळे यांच्या विरोधात सुधीर म्हस्के, पारनेर सोसायटी मतदारसंघात खा. निलेश लंके विरोधात राहुल शिंदे, अनुसूचित जाती जमाती मतदारसंघात माजी आ. वैभव पिचड, विरोधात



माजी खासदार सदाशिव लोखंडे यांचे पुत्र प्रशांत लोखंडे निवडणूक रिंगणात आहेत.

तसेच कर्जत सोसायटी मतदारसंघात ज्योती शिंदे या नशिब आजमावत असून महिला राखीव मतदारसंघातील दोन जागांसाठी अनुराधा नागवडे, संगीता वाघ यांच्या विरोधात माजी जिल्हा परिषद सदस्य हर्षदा काकडे, संध्या महांडुळे यांच्यासह सुवर्णा पाचपुते, पुष्पा गायकवाड या निवडणूक रिंगणात आहेत.

तसेच ओबीसी मतदारसंघातून कारभारी जावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर वाकचौरे, जामखेडचे आजिनाथ हजारे, शिवदास गुंजाळ व कडूचंद शेटे निवडणूक लढवत आहेत. विजाभज मतदारसंघातून बँकेचे माजी संचालक गणपतराव सांगळे यांचे विरोधात ॲड. प्रताप ढाकणे यांचे चिरंजीव ऋषिकेश ढाकणे यांच्यासह सुभाष गीते निवडणूक लढवत आहेत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मतदानाची तयारी पूर्ण झाली असून आज जिल्ह्यातील १४ तालुक्यासह नगर शहर अशा ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान होणार असून त्यानंतर उद्या मंगळवारी कल्याण रोडवरील मंगल कार्यालयात मतमोजणी होणार आहे. सर्व निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांच्यासह प्रशासन प्रयत्नशिल आहे.

बिनविरोध संचालक

■ यापूर्वी जिल्हा बँकेवर सोसायटी मतदारसंघातून आ. मोनिकाताई राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, ज्येष्ठ नेते बिपिनदादा कोल्हे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले पाटील, माजी संचालक करण ससाने, संगमनेरचे रणजीत देशमुख आणि दत्तात्रय पानसरे यासह जामखेडमधून सचिन घुमरे बिनविरोध निवडून आलेले आहेत. तसेच बिगर शेती मतदारसंघातून सचिन जगताप हे जिल्हा बँकेत बिनविरोध निवडून आलेले आहेत.

इंडिया आघाडीची अभूतपूर्व रॅली

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या आणि एसआयआरच्या निषेधार्थ इंडिया ब्लॉकने दिल्लीत अभूतपूर्व रॅली काढली. चार तास चाललेल्या या आंदोलनात २० विरोधी पक्षांनी सहभाग घेतला.

या आंदोलनादरम्यान डाव्या पक्षाचे नेते एम. ए. बेबी, तेजस्वी यादव, मल्लिकार्जुन खरगे, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती आणि अखेरीस राहुल गांधी यांनी रामलीला मैदानावर भाषणे दिली. यावेळी राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतचोरीचा कट रचला. त्यामुळे त्यांना तुरुंगात जायलाच हवे, असे म्हटले. मल्लिकार्जुन खरगे यांनी ते अंडरवर्ल्डमध्ये गेले तरी आम्ही त्यांना शोधून परत आणू. आम्ही त्यांना सोडणार नाही, असा इशारा दिला.

अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशचा उल्लेख करत म्हटले की, जे एकदा उत्तर प्रदेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातूनच निघून जातील. जर उत्तर प्रदेशातील लोकांनी त्यांचे चांगले स्वागत केले तर ते त्यांना चांगला निरोपही देतात. २०२७ मध्ये त्यांचे जाणे निश्चित आहे. गेल्या २५ दिवसांत विरोधी पक्ष या मुद्यावर एकत्र येण्याची ही सातवी वेळ होती. यापूर्वी त्यांनी ६ ते १३ ऑक्टोबर दरम्यान सहा वेळा आंदोलन केले होते.

राहुल गांधी म्हणाले, ज्ञानेश कुमार यांना रात्री झोप लागत नाही. ते घाबरले आहेत. त्यांनी सर्वांत मोठा गुन्हा केला आहे. त्यांनी राष्ट्राचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला, तो दडपून टाकला. आता मोदी आणि शाह या दोघांनाही झोप लागत नाही. आम्ही वैरभाव बाळगणारे लोक नाही. आपल्याला द्वेष नाही तर प्रेम पसरवायचे आहे. हे आंदोलन कोणत्याही एका पक्षासाठी, कोणत्याही एका नेत्यासाठी नाही. हे आंदोलन राष्ट्रासाठी आहे. हा राष्ट्राचा आवाज आहे.

मी तुम्हाला सांगतो, मोदी कुठेही जाऊ शकत नाहीत. जरी त्यांना जायचे असले तरी, आम्ही त्यांना जाऊ देणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्यानंतर आम्ही तुमच्यासमोर उभे राहणार आहोत. तुमच्या मतचोरीविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल.

'अर्णब'नंतर आता मुरास चक्रीवादळाचा धोका!

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –

बंगालच्या उपसागरात अवघ्या चार दिवसांपूर्वी आलेल्या अर्णब अतितीव्र चक्रीवादळाच्या हाहाकारातून नागरिक सावरत नाहीत, तोच आता मुरासु या नव्या चक्रीवादळाची भीषण दहशत निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरातील तीव्र कमी दाबाच्या पट्ट्याचे चक्रवाती वादळात रूपांतर झाले असून ते वेगाने उत्तर-पश्चिम दिशेकडे सरकत आहे.

हे नवीन वादळ २ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून ते ३ नोव्हेंबरच्या पहाटेच्या दरम्यान दक्षिण आंध्र प्रदेश किनारपट्टीवरील नेल्लोर आणि नरसापूर दरम्यान जमिनीवर धडकण्याची शक्यता आहे. अर्णब वादळाने आधीच विस्कळीत केलेल्या पायाभूत सुविधा आणि शेतीला या नव्या संकटामुळे पुन्हा एकदा मोठा तडाखा बसण्याची भीती असल्याने संपूर्ण किनारपट्टी भागात हाय-अलर्ट जारी करण्यात आला आहे.

बंगालच्या उपसागरात एकाच आठवड्यात दोन लागोपाठ चक्रीवादळे निर्माण झाल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांची मोठी धावपळ उडाली आहे. २८ ऑक्टोबर रोजी धडकलेल्या अर्णब चक्रीवादळाने आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टी भागात मुसळधार पाऊस, झाडे उन्मळून पडणे आणि वीज पुरवठा खंडित करून प्रचंड नुकसान केले आहे. या नुकसानीचे पंचनामे आणि मदतकार्य सुरू असतानाच, आता मुरासु हे नवीन संकट समोर उभे राहिले आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, मुरासु जमिनीवर धडकत असताना वा-याचा वेग ताशी १०० ते ११० किलोमीटर आणि काही वेळा झटक्यांमध्ये १२० किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो. दक्षिण किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, रायलसीमा आणि तामिळनाडूच्या उत्तर भागात पुढील तीन दिवस अत्यंत मुसळधार ते अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या वादळाचा परिणाम पूर्व विदर्भ आणि महाराष्ट्राच्या काही भागांवरही होणार असून हवामान खात्याने ५ नोव्हेंबरपर्यंत ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत भाविकांसाठी सुविधांचे नियोजन करा

गर्दी नियंत्रणासाठी २४ तास कमांड सिस्टीम कार्यान्वित करण्याचे पालकमंत्री विखे पाटील यांचे निर्देश

● **शिर्डी । वीरभूमी** –

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे जाणारे भाविक शिर्डीत श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व यंत्रणांनी सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था युद्धपातळीवर पूर्ण करावी. गर्दी नियंत्रणासाठी पोलिसांनी २४ तास कार्यरत कमांड सिस्टीम सुरू करावी, असे निर्देश राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिर परिसरातील झिरो सभागृहात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित विविध विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्यासह नगरसेवक आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कुंभमेळ्यासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणारे भाविक शिर्डीत दर्शनासाठी येणार असल्याने पार्किंग, दर्शनरांग व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधांचे नियोजन प्राधान्याने करावे, असे विखे पाटील यांनी सांगितले. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथून शिर्डीसाठी विशेष वातानुकूलित इलेक्ट्रिक बसची व्यवस्था करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

गर्दी नियंत्रणासाठी शहरातील महत्त्वाचे चौक, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, विमानतळ, मुख्य रस्ते आणि मंदिर परिसरात सीसीटीव्ही व ध्वनिक्षेपक यंत्रणा उभारावी. यासाठी २४ तास कार्यरत नियंत्रण कक्षाचा प्रस्ताव पोलीस प्रशासनाने तातडीने सादर करावा, असे त्यांनी सांगितले.

शिर्डी शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन नगरपालिका, बांधकाम विभाग, रस्ते विकास महामंडळ, महावितरण आणि पाणीपुरवठा विभागाने भविष्यातील गरजांनुसार पायाभूत सुविधांचे नियोजन करावे. कुंभमेळ्याच्या पर्वणी काळात भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता मुख्य महामार्ग व जोडरस्त्यांचे रुंदीकरण वेगाने पूर्ण करावे. शहराबाहेरील मोकळ्या जागांवर सुसज्ज पार्किंग सुविधा उभाराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

श्री साईबाबा संस्थानने भाविकांना सुलभ दर्शनासाठी दर्शनरांगांचे



व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि प्रथमोपचार केंद्रांची व्यवस्था वेळेत पूर्ण करावी. समाजमाध्यमे, रिल्स आणि भाविकांच्या माध्यमातून शिर्डीकडे अधिकाधिक भाविक आकर्षित करण्यासाठी संस्थानने प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

एकाही भाविकाची गैरसोय होऊ नये. सुरक्षा आणि सुविधांना प्राधान्य देत सर्व विभागांनी समन्वयाने कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा इशारा पालकमंत्री विखे पाटील यांनी दिला.

वीरभूमी

SPOT NEWS

५ नोव्हेंबरला विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मोर्चा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संयुक्त कृती समितीतर्फे ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ते उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व विध्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संयुक्त कृती समिती आणि महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर कर्मचारी महासंघ वतीने आंदोलन पुकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इघे व सचिव संतोष कानडे यांनी दिली. या मोर्चात जिल्हातील सर्व संघटनाचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासचिव रावसाहेब त्रिभुवन तसेच संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख यांनी केले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत आश्वासित योजनेचे १०,२० आणि ३० वर्षाचे तीन लाभ तात्काळ लागू करणे, विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आठवड्यातून पाच दिवसांचे काम लागू करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालय परिचरांना सुधारीत ग्रेड पे वेतन लागू करणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे आणि कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधले जाणार आहे.

निमगाव वाघात क्रीडा शिक्षक आप्पासाहेब कदम यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयाचे क्रीडा शिक्षक आप्पासाहेब नामदेव कदम यांना शिर्डी येथील बी. द. चेंज फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल नवनाथ विद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. नवनाथ विद्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने कदम यांचा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी सत्कार केला. आप्पासाहेब कदम यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यात शिस्त, संघभावना, आत्मविश्वास आणि जिद्द निर्माण व्हावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्न करीत असतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षक हा केवळ पुस्तकी ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. क्रीडा क्षेत्रातून विद्यार्थ्यांमध्ये मेहनत, चिकाटी, खिलाडूवृत्ती आणि पराभवातून पुन्हा उभे राहण्याची ताकद निर्माण होते. या दृष्टीने कदम यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली. मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांनी कदम यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

घरफोडीचा तपास करा, अन्यथा रास्ता रोको

दहा तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरीला । ४ नोव्हेंबरला आंदोलनाचा महिलांचा इशारा

● **पारनेर । वीरभूमी –**

टाकळी ढोकेश्वर येथील घरफोडी प्रकरणाचा तातडीने तपास करून चोरीस गेलेले दहा तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करावी, अन्यथा बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता वासुंदा चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मंगल संतोष गोरडे यांच्यासह गावातील महिलांनी पोलीस प्रशासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

मंगल गोरडे यांच्या घरात २५ ऑक्टोबर रोजी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दहा तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. मात्र, घटनेला पाच दिवस उलटूनही चोरट्यांचा शोध लागलेला नसून चोरीचा मुद्देमालही हस्तगत झालेला नाही. त्यामुळे गोरडे कुटुंबीयांचे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण आहे.



टाकळी ढोकेश्वर व परिसरात यापूर्वीही चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्यांचा तपास न लागल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी प्रभावी गस्त घालावी, चोरट्यांचा शोध घेऊन चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळवून द्यावा, अशी मागणी महिलांनी केली आहे.

याबाबत टाकळी ढोकेश्वर पोलीस दूरक्षेत्र आणि पारनेर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले असून, त्याची प्रत पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनाही पाठविण्यात आली आहे. तपासात प्रगती न झाल्यास ४ नोव्हेंबरला रास्ता रोको आंदोलन करण्यावर महिला ठाम असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी माजी सरपंच शिवाजी खिलारी, उपसरपंच किरण तराळ, सुनील गोरडे, ग्रामपंचायत सदस्य शुभम गोरडे, जयसिंग झावरे पाटील, विश्वनाथ बांडे, सौ. अंजनाबाई विश्वनाथ बांडे, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, संजय झावरे यांच्यासह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

टाकळी ढोकेश्वर येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन कार्यान्वित करा : विक्रम झावरे

■ टाकळी ढोकेश्वर व परिसरात वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरातील वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक विस्तार लक्षात घेता येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजूर झाले असून, ते लवकरात लवकर कार्यान्वित करावे, अशी मागणी विक्रम झावरे यांनी केली. स्वतंत्र पोलीस स्टेशनमुळे परिसरात प्रभावी गस्त आणि गुन्ह्यांचा तातडीने तपास करणे शक्य होईल, असेही त्यांनी नमूद केले.

वसुंधरा अॅकॅडमीत पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती; अॅड. मंगला हांडे यांचे मार्गदर्शन



● **अकोले । वीरभूमी –**

अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अॅकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांसाठी पॉक्सो कायद्याविषयी जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत अॅड. मंगला हांडे यांनी विद्यार्थ्यांना बालसुरक्षा, वैयक्तिक सुरक्षितता आणि कायदेशीर हक्कांविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी अॅड. हांडे यांनी पॉक्सो कायद्याची माहिती देताना सुरक्षित आणि असुरक्षित परिस्थिती ओळखणे, स्वतःच्या वैयक्तिक मर्यादा समजून घेणे तसेच अयोग्य वर्तनाविषयी जागरूक राहण्याचे महत्त्व स्पष्ट केले. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी न घाबरता पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तींशी संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये बालसुरक्षेविषयी जागरूकता, आत्मविश्वास आणि गरजेच्या वेळी मदत मागण्याची मानसिकता निर्माण करणे हा कार्यशाळेचा उद्देश होता. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

प्रत्येक बालकाला सुरक्षित आणि निर्भय वातावरण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला. कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि उपप्राचार्या राधिका नवले यांचे मार्गदर्शन लाभले. दर्शना अर्दड यांनी सूत्रसंचालन केले.

जिल्हा बँक निवडणुकीसाठी पारनेर सज्ज!

सहकार विकास आघाडी आणि सहकार परिवर्तन पॅनलमध्ये अटीतटीची लढत

● **पारनेर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादितच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी होणाऱ्या संचालकपदाच्या निवडणुकीची पारनेरमध्ये जय्यत तयारी करण्यात आली आहे. सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. पारनेर कॉलेज रोडवरील न्यू इंग्लिश स्कूल येथे मतदानाची व्यवस्था करण्यात आली असून, निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.



या निवडणुकीत सहकार विकास आघाडी आणि सहकार परिवर्तन पॅनल यांच्यात प्रतिष्ठेची लढत होण्याची चिन्हे आहेत. दोन्ही पॅनलने निवडणुकीसाठी जोरदार तयारी केली असून, आपापल्या बाजूने वातावरणनिर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे पारनेर तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणुकीत अटीतटीची चुरस अपेक्षित असल्याने मतदान प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनानेही आवश्यक तयारी केली आहे. मतदान केंद्रावर शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततेत पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठीही व्यवस्था सज्ज ठेवण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या या निवडणुकीकडे सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, मतदानातून कोणाच्या बाजूने कौल मिळतो, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा



● **पाथर्डी । वीरभूमी –**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने (एन. सी. सी.) भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात १७ महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल प्रदीपकुमार बेहरा व डम ऑफिसर कर्नल निकेत नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील व श्रीतीलोक जैन विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांची सायकल रॅली काढण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी सायकल राहिलेला हिरवा झेंडा दाखवून भारतामध्ये शांतता, एकता व अखंडता टिकवण्याची प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे असा संदेश दिला. भारत माता की जय, जय जवान जय किसान, वंदे मातरम यासारख्या विविध घोषणांनी शहर परिसर दुमदुमून टाकला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांना राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि देशाच्या अखंडतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

या कार्यक्रमास श्रीतीलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य भारत गाडेकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन अजयकुमार पालवे व चीप ऑफिसर बाळासाहेब गांगुर्डे यांनी केले.

चिमुकल्यांच्या आनंदात जपल्या दिवंगत मुलाच्या स्मृती!

संतोष एडके यांचेकडून कोकीसपीर शाळेतील ४० विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप

● **पाथर्डी । वीरभूमी–**

आपल्या दिवंगत मुलाच्या आठवणी समाजोपयोगी कार्यातून जिवंत ठेवण्याचा संवेदनशील उपक्रम पाथर्डी पंचायत समितीचे शाखा अभियंता संतोष एडके व त्यांच्या कुटुंबीयांनी राबविला. तालुक्यातील दुर्गम कोकीसपीर तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या वर्गातील ४० विद्यार्थ्यांना त्यांच्या वतीने स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सदस्य विष्णुपंत पवार होते. यावेळी माजी सरपंच पी. आर. राठोड, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष दिनकर राठोड, मुख्याध्यापिका मनीषा गवळी, उपाध्यापक भोलेनाथ मर्दाने, एकनाथ चव्हाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवीन स्पोर्ट्स ड्रेस मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आपल्या मुलाच्या स्मृती केवळ आठवणींपुरत्या मर्यादित न ठेवता गरजू विद्यार्थ्यांच्या आनंदातून जपण्याचा एडके कुटुंबीयांचा हा प्रयत्न उपस्थितांच्या मनाला भावला.

यावेळी विष्णुपंत पवार म्हणाले, एडके यांच्या चिमुकल्या मुलाने हे जग सोडले असले, तरी त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ आज ४० विद्यार्थ्यांच्या अंगावर नवे कपडे आले आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच आपल्या लेकराला दिलेली मोठी श्रद्धांजली आहे. हा उपक्रम केवळ कपडे वाटपाचा नसून माणुसकी आणि सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श आहे.

दुःखाच्या प्रसंगातूनही समाजासाठी सकारात्मक कार्य करण्याची प्रेरणा घेता येते, हे एडके कुटुंबीयांनी कृतीतून दाखवून दिले. त्यांच्या या दातृत्वाचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोलेनाथ मर्दाने यांनी केले. मुख्याध्यापिका मनीषा गवळी यांनी प्रास्ताविक केले, तर एकनाथ चव्हाण यांनी आभार मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

नगरमध्ये रंगणार 'द भक्ती बीट्स'चा भजन जॅमिंग अँड फ्युजनचा अनोखा अविष्कार

● अहिल्यानगर । वीरभूमी –

भारतीय भक्तिसंगीताची आध्यात्मिक समृद्धी आणि आधुनिक संगीताची ऊर्जा यांचा अनोखा संगम अनुभवण्याची पर्वणी अहिल्यानगरकरांना मिळणार आहे. अनाहत एक कलासृष्टी प्रस्तुत 'द भक्ती बीट्स – देव । देश । धर्म' या अभिनव संकल्पनेतून 'भजन जॅमिंग अँड फ्युजन' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. महावीर ग्रुप यांच्या विशेष सहकार्यातून, तर विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या विशेष सहयोगातून हा भक्तिरसपूर्ण सांगीतिक सोहळा रंगणार आहे. भक्तिसंगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. पारंपरिक भजनांमधील भक्तिभाव, भावस्पर्शी शब्द आणि आध्यात्मिक ऊर्जा यांना आधुनिक संगीतशैलीची जोड देऊन नव्या पिढीला भारतीय भक्तिसंगीताशी जोडण्याचा अभिनव प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. 'देव, देश आणि धर्म' या मूल्यांचा संगीताच्या वैश्विक भाषेतून जागर करताना पारंपरिक भक्तिसंगीताचा आत्मा आणि त्यातील पावित्र्य जपण्याचा विशेष प्रयत्न या संकल्पनेतून केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे पारंपरिक भारतीय संगीत वाद्ये आणि आधुनिक वाद्यांचा अनोखा संगम असणार आहे. तबला, पखवाज, हार्मोनियम आणि ढोलक यांसारख्या पारंपरिक वाद्यांसोबत गिटार, की-बोर्ड आणि आधुनिक तालवाद्यांची सुरेल साथ रसिकांना अनुभवता येणार आहे. भक्तिरसपूर्ण गायन, पारंपरिक सुरावटी, दमदार ताल आणि आधुनिक फ्युजन यांच्या माध्यमातून भजनांचा एक वेगळाच संगीताविष्कार सादर केला जाणार आहे. त्यामुळे पारंपरिक भजनांचा आनंद घेतानाच आधुनिक संगीताची ऊर्जा अनुभवण्याची संधी संगीतप्रेमींना मिळणार आहे. या सांगीतिक सोहळ्याला आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, समर्थभक्त मंदारबुवा रामदासी, सेंट्रल बँकेचे मुख्य प्रबंधक नरेश कुमार दुबे, नागेश्वरी भोसले, साईदिप हिरोचे सचिन बोरा, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे आणि मनोज झंवर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

बेसबॉल स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरचे वर्चस्व कायम

● अहिल्यानगर । वीरभूमी –

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय बेसबॉल स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सलग पाचव्यांदा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे प्रशालेच्या संघाची बारामती येथे होणाऱ्या पुणे विभागीय बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात करत हे यश संपादन केले. यामध्ये कर्णधार अर्चित कवडे याच्यासह सोहम रुपनर , अभय खंडागळे, तन्मय फुले, आयुष हापसे, वेदांत लटके, कृष्णा टेंभुर्कर, कार्तिक कुलकर्णी, ऋग्वेद कुलकर्णी, सार्थक गायकवाड, तनिष्क वालझाडे, सर्वेश मुटकुळे, सात्विक दातीर, संग्राम जरे, सर्वेश येमूल, साईराज तुरे आदी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या सर्व खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा विभागप्रमुख श्री. पी. पी. लोंढे सर यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या खेळाडूंनी सलग पाचव्यांदा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, शालेय समितीचे चेअरमन किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुणे विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दुष्काळात पशुधन संरक्षणासाठी चारा-पाणी नियोजनावर भर

पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांचा जिल्हा दौरा । चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांचा आढावा

● अहिल्यानगर । वीरभूमी–

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संरक्षण, चारा व पाणी उपलब्धता आणि दुग्धव्यवसायाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान अहिल्यानगर जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात दूध संघ, गोशाळा, पशुखाद्य उद्योग, शेतकरी व पशुपालकांशी संवाद साधून चारा टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

संगमनेर तालुक्यातील राजहंस दूध संघ आणि जीवदया गोशाळेला भेट देऊन व्यवस्थापन व दुग्धव्यवसायाची माहिती घेतली. राजहंस दूध संघाच्या कार्यक्षेत्रात चारा साक्षरता व संवर्धन अभियान राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

३० ऑक्टोबर रोजी कोपरगाव तालुक्यातील गोदावरी खोरे नामदेवराव परजणे पाटील दूध संघ आणि वळूमाता प्रक्षेत्राची पाहणी करण्यात आली. दूध संकलन, पशुधनाची स्थिती, चारा-पाणी व्यवस्थापन आणि दुष्काळाचा दुग्धव्यवसायावरील परिणाम जाणून घेण्यात आला.

श्रीरामपूर तालुक्यातील निमगाव खैरी येथे सुक्या चाऱ्याची पौष्टिकता



वाढविण्यासाठी युरिया, गूळ व मीठ यांच्या योग्य वापराचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच सुमारे एक लाख मेट्रिक टन मुरघास पुरवठा क्षमता असलेल्या -सीळपर्शीळली कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करून मुरघास उपलब्धता व पुरवठा व्यवस्थेची माहिती घेण्यात आली.

शेवगाव तालुक्यातील श्रीकृष्ण गोशाळेतही चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे पशुपालकांशी संवाद साधून चारा व पाणीटंचाईची परिस्थिती जाणून घेण्यात आली. चारा व उसाचे दर तुलनेने कमी असताना मुरघास निर्मितीचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले. पशुपालकांनी मूल्यवान पशुधन विकू नये, तसेच स्थानिक चारा डेपो सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील श्री. गांगेय गोशाळा आणि चौंडी येथे भेट देऊन चारा-पाणीटंचाईच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. त्यानंतर जिल्हास्तरीय आढावा बैठकीत पशुधनाची स्थिती, चारा-पाणी उपलब्धता आणि आगामी नियोजनाचा आढावा घेण्यात आला. प्रगतशील शेतकरी रामनाथ वदक आणि सामाजिक कार्यकर्ते सागर वाकचौरे यांच्याशीही चारा नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

३१ ऑक्टोबर रोजी कामरगाव येथे पाहणी केल्यानंतर पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी येथील जाफा पशुखाद्य कंपनीला भेट देण्यात आली. पशुखाद्य निर्मिती प्रक्रिया आणि गुणवत्ता तपासणीची माहिती घेण्यात आली. रांजणगाव मशीद येथील ज्ञानेश्वरी गोपालन संस्थेत परिपोषण आहार योजना, जीवामृत, गोबरगॅस व मुरघास निर्मिती उपक्रमांची पाहणी करण्यात आली. रांजणगाव मशीद व पिंपरी गवळी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून चारा-पाणीटंचाईच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. चारा बियाणे वाटपाचा आढावा घेऊन विविध विभागांच्या समन्वयातून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या दौऱ्यात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त डॉ. दशरथ दिघे यांच्यासह संबंधित तालुक्यांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दौऱ्यात निकृष्ट चारा सकस करणे, मुरघास निर्मिती व पुरवठा, चारा बियाणे वाटप, स्थानिक चारा डेपो, पाणी नियोजन आणि पशुधन आरोग्य सेवा यावर भर देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच उपलब्ध संसाधनांचा वापर करून चारा-पाण्याची पूर्वतयारी करावी आणि पशुपालकांच्या सहभागातून पशुधनाचे संरक्षण करावे, हा दौऱ्याचा मुख्य संदेश असल्याचे सांगण्यात आले.

शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी भास्कर कानवडे



सरचिटणीसपदी किरण चौधरी; नूतन कार्यकारीणीच्या बैठकीत निवडी

● अकोले । वीरभूमी –

महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाशी संलग्न असलेल्या अकोले तालुका माध्यमिक शिक्षक संघाची सर्वसाधारण सभा अगस्ती विद्यालय, अकोले येथे उत्साहात पार पडली. या सभेत संघाच्या अध्यक्षपदी भास्कर कानवडे, तर सरचिटणीसपदी किरण चौधरी यांची निवड करण्यात आली.

मावळते अध्यक्ष पंडित नेहे तसेच जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सहसचिव रावसाहेब शेळके आणि सुनील वाळुंज यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा झाली.

सभेत जुनी पेन्शन योजना, महागाई भत्ता, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार आणि माध्यमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांचे हक्क आणि न्याय्य मागण्यांसाठी संघटनात्मक पातळीवर एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सभेला तालुक्यातील मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष : भास्कर कानवडे, सरचिटणीस : किरण चौधरी, उपाध्यक्ष : जितेंद्र खैरनार, जगन मुतडक, श्याम मालुंजकर, अनिल गजे, सहचिटणीस : संदीप काळे, संजय दिघे, खजिनदार : नाना जाधव, एस. आर. देशमुख, हिशोब तपासणीस : संजय मालुंजकर, महिला प्रतिनिधी : शितल बिबवे, गायकवाड मॅडम, प्रसिद्धी प्रमुख : घनश्याम माने, विनोद नवले, दत्ता जाधव, जिल्हा प्रतिनिधी : संजय व्यवहारे, रवींद्र तोरमल, अनिल चासकर, धनंजय भांगरे, सतीश काळे, शहाजी मुंतोडे, बाळासाहेब दातीर, दीपक कचरे, शिवाजी गोरडे, सचिन वाकचौरे. नूतन कार्यकारिणीचा उपस्थित शिक्षकांच्या वतीने सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

दोडक्याच्या शेतात गांजाची लागवड; १५.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त

वाशेरे शिवारात अकोले पोलिसांचा छापा । वाटेकरी विजय गजे याला अटक

● अकोले । वीरभूमी–

अकोले शहराजवळील वाशेरे शिवारात दोडक्याच्या पिकात गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अकोले पोलिसांनी छापा टाकून गांजाची पाच झाडे आणि हिरवा पाला असा एकूण १५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी वाटेकरी विजय रघुनाथ गजे (रा. वाशेरे) याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

शेकईवाडी येथील सिताराम सुरेश गायकवाड यांच्या मालकीची वाशेरे शिवारात शेतजमीन आहे. या जमिनीत विजय गजे याने वाट्याने दोडक्याचे पीक घेतले होते. मात्र, दोडक्याच्या पिकामध्ये गांजाची झाडे लावून त्यांचे संवर्धन व जोपासना केली जात असल्याची माहिती अकोले पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने वाशेरे शिवारातील शेतात छापा टाकला. यावेळी दोडक्याच्या



बागेत गांजाची पाच झाडे आढळून आली. पोलिसांनी गांजाची झाडे व हिरवा पाला असा एकूण १५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी विजय रघुनाथ गजे (रा. वाशेरे) याच्याविरुद्ध अकोले पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा कलम ८(ब), २०(अ) आणि २०(ब)(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला अटक करून न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल रवींद्र वाकचौरे, पोलीस कॉन्स्टेबल अविनाश गोडगे, तोरकडी, सुहास गोरे, महेंद्र गुंजाळ आणि मनोहर मोरे यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप हजारे करीत आहेत.

श्री विवेकानंद विद्यामंदिरच्या ५४५ विद्यार्थ्यांनी बनवले इकोफ्रेंडली आकाशकंदील!

पर्यावरणपूरक आकाशकंदील बनवा कार्यशाळा । प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त दिवाळीचा विद्यार्थ्यांचा संकल्प

● पाथर्डी । वीरभूमी–

विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता, कल्पकता आणि कलाकौशल्याला वाव देण्यासाठी पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी इकोफ्रेंडली आकाशकंदील व पणती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ५४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश दिला.

संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळून रंगीत कागद, कार्डशीट, टिंटेड पेपर, कापडी लेस, डिंक, दोरा आणि गोंद यांसारख्या पर्यावरणपूरक साहित्यापासून आकर्षक आकाशकंदील व पणत्या तयार केल्या. स्वतः तयार केलेल्या वस्तू पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला.

यावेळी मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, पर्यवेक्षक संपत घारे आणि कलाशिक्षक दीपक राठोड यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापक शरद मेढे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

कार्यशाळेत तयार केलेले आकाशकंदील व पणत्या दिवाळीत घरात वापरण्याचा तसेच बाजारातील प्लास्टिकच्या आकाशकंदिलांना पर्याय निवडण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमाचे पालकांनीही समाधान व्यक्त केले.

कलाशिक्षक दीपक राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आकाशकंदील तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी दीपक राठोड, रत्नमाला सांगळे, सुवर्णा ढाकणे, गार्गी तरवडे, अर्चना धायतडक, शितल आंधळे, अनिता केदार, दादासाहेब उदमले, शशांक महाजन, रेखा गणगे, माधुरी रणदिवे आणि जयश्री खोरदे यांनी परिश्रम घेतले.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

वीरभूमी

टँकर चालकांचा संप; १२० गावांचा पाणीपुरवठा ठप्प!

चालकांना मारहाण आणि दादागिरीच्या निषेधार्थ राक्षी येथे टँकर उभे । ठेकेदाराच्या मध्यस्थीनंतर २४ तासांनी पाणी भरण्यास सुरुवात

● **पाथर्डी । वीरभूमी –**

पाणीटंचाईची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना पाणी वितरणातील वादातून संतप्त ग्रामस्थांनी टँकर चालकाला शिवीगाळ करून चापट मारल्याची घटना घडली. वारंवार होणाऱ्या मारहाण आणि दादागिरीच्या घटनांच्या निषेधार्थ सर्व टँकर चालकांनी शनिवारी दुपारी राक्षी (ता. शेवगाव) येथील पाणी भरण्याच्या ठिकाणी टँकर उभे करून काम बंद आंदोलन सुरू केले. पाणी वितरण व्यवस्थेत सुसूत्रता आणावी आणि मारहाण करणाऱ्यांवर कारवाई करावी, या मागणीसाठी चालकांनी टँकर भरण्यास नकार दिला. त्यामुळे शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांतील सुमारे १२० गावांचा पाणीपुरवठा २४ तास ठप्प झाला. अखेर ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी दत्तात्रय नागरगोजे यांनी चालकांशी चर्चा करून शेवगाव पोलीस ठाण्यात दिलेले पत्र दाखविल्यानंतर रविवारी सायंकाळी टँकर भरण्यास सुरुवात झाली.

जिल्ह्यात सर्वाधिक पाणीटंचाई पाथर्डी तालुक्यात असून, एकट्या तालुक्यात ९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यातील बहुतांश टँकर शेवगाव तालुक्यातील राक्षी येथून भरले जातात. मात्र, टँकर भरण्याच्या ठिकाणी मोठमोठे खड्डे, मातीचे ढिगारे असून, साधे सपाटीकरणही करण्यात आलेले नाही. चालकांना अनेक तास टँकर भरण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते. तीन ते सात तास नंबर येण्यासाठी लागतात. मात्र, तेथे स्वच्छतागृह, विश्रांती कक्ष किंवा जेवणाची कोणतीही सुविधा नाही, अशी व्यथा चालकांनी मांडली.

संतोष आहेर, श्रीमंत नेमाने, गणेश गोरे, भारत गोंधळी आणि मारुती माळवदे या टँकर चालकांनी आपल्यावरील कामाचा ताण आणि अडचणी मांडल्या. गावोगावी पाणी वितरण करताना राजकीय गटबाजी आणि स्थानिक दादागिरीचा सामना करावा लागतो. टँकर घरासमोर आल्यानंतर काही नागरिक घरातील सर्व भांडी भरून घेतल्याशिवाय टँकर पुढे जाऊ देत नाहीत. काही ठिकाणी टँकरला आडवे उभे राहून तांब्याभर पाण्याची मागणी केली जाते. घरागणिक पाणीवाटप केले नाही तर नागरिक दांडके घेऊन उभे राहतात. पाथर्डी तालुक्याच्या पूर्व भागातील एका गावात चालकाला तलवार दाखवून धमकावण्यात आल्याची घटनाही घडल्याचे त्यांनी सांगितले.

गावांमध्ये सार्वजनिक विहीर किंवा टाकीवर पाणी टाकण्याची व्यवस्था केल्यास वितरणातील वाद कमी होतील. मात्र, दोन महिन्यांपूर्वी



गावोगावी पाण्याच्या टाक्या देण्याचे आश्वासन देऊनही त्याची पूर्तता झालेली नाही. बहुतेक ठिकाणी पाणीवाटपासाठी शिपाई किंवा ग्रामसेवक उपस्थित नसतो. त्यामुळे मनमानी पद्धतीने पाणी घेतले जाते. एका कुटुंबाला ३०० लिटर पाणी देण्याची सूचना असताना काही कुटुंबे जबरदस्तीने एक हजार लिटरपर्यंत पाणी घेतात. काही ठिकाणी वैयक्तिक बोअरवेलमध्ये टँकरचे पाणी टाकण्याची सक्ती केली जाते. मोठ्या नेत्यांची नावे सांगून चालकांना धमकावले जाते, असेही त्यांनी सांगितले.

राक्षी येथील पाणी भरण्याच्या ठिकाणची दुरवस्था हा आणखी एक गंभीर प्रश्न आहे. गुडघाभर खड्ड्यांतून टँकर न्यावे लागत असल्याने वाहनांचे टायर फुटतात, पाटे तुटतात, टाक्या फुटतात आणि वेल्डिंग तुटून पाण्याची गळती होते. वाहनांचे नुकसान सोसण्याबरोबरच गावोगावी होणारी दादागिरी आणि मारहाणही सहन करावी लागते. टँकरमागे धावणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षेची चिंता असते. धावपळीमुळे कुटुंबीयांशी संवाद साधायलाही वेळ मिळत नाही. रात्री उशिरा घरी संपर्क साधेपर्यंत मुले झोपलेली असतात. अशा परिस्थितीत काम करायचे कसे, असा सवाल चालकांनी उपस्थित केला.

शनिवारी दुपारी चारच्या सुमारास चालकांनी मारहाणीच्या निषेधार्थ टँकर भरणे बंद केले. रविवारी दुपारी चार वाजेपर्यंत सर्व टँकर रस्त्याच्या कडेला उभे होते. चालकांचा संताप अनावर झाला होता. मात्र, स्थानिक प्रशासनातील कोणताही अधिकारी घटनास्थळी फिरकला नसल्याचे चालकांनी सांगितले.

दरम्यान, रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी दत्तात्रय नागरगोजे यांनी राक्षी येथे भेट देऊन चालकांशी चर्चा केली. मारहाणीच्या घटनेबाबत शेवगाव पोलीस निरीक्षकांना पत्र दिल्याचे त्यांनी सांगितले. टँकर बंद ठेवून तहानेने व्याकूळ झालेल्या नागरिकांची गैरसोय करणे योग्य नाही. प्रशासनाने दखल न घेतल्यास दोन दिवसांनंतर पुन्हा अधिकाऱ्यांशी संपर्क साधून टँकर पुरवठ्यातील अडचणी मांडू. त्यामुळे तातडीने टँकर भरण्यास सुरुवात करा, असे आवाहन त्यांनी केले. त्यानंतर रविवारी सायंकाळी साडेचार ते पावणेपाचच्या सुमारास टँकर भरण्यास सुरुवात झाली.

प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज

■ पाणी वितरणातील गोंधळ, गावोगावी होणारी दादागिरी, चालकांना मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि टँकर भरण्याच्या ठिकाणची दुरवस्था यामुळे संपूर्ण व्यवस्था अडचणीत आली आहे. टँकर चालक आणि ग्रामस्थ यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी सार्वजनिक पाणी साठवण टाक्या, नियोजनबद्ध वितरण, वाहनतळाचे सपाटीकरण तसेच चालकांना आवश्यक सुविधा व संरक्षण देणे गरजेचे आहे. हा प्रश्न हाताबाहेर जाण्यापूर्वी शेवगाव व पाथर्डीचे तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि प्रांताधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष घालून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

पिंपरी जलसेन शाळेच्या विद्यार्थ्यांकडून स्नेहालयातील मुलांना दिवाळी भेट

जीवनावश्यक वस्तूंचे वाटप । विद्यार्थ्यांनी जपली सामाजिक बांधिलकी

● **पारनेर । वीरभूमी–**

दिवाळीचा आनंद वंचित मुलांसोबत साजरा करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरी जलसेन येथील विद्यार्थ्यांच्या वतीने स्नेहालय संस्थेतील निराधार मुलांना जीवनावश्यक वस्तूंची भेट देण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक संवेदनशीलता आणि माणुसकीचे दर्शन घडविले.



यावेळी स्नेहालयातील मुलांना अंगाचा साबण, टूथब्रश, कंगवा, कपडे धुण्याचा साबण यांसह दैनंदिन वापरातील विविध वस्तू भेट देण्यात आल्या. समाजातील गरजू मुलांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यां मध्ये लहानपणापासूनच सहकार्य, दातृत्व आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजावी, हा यामागील उद्देश होता.

दिवाळीचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा आणि वंचित मुलांच्याही चेहऱ्यावर आनंद फुलावा, या भावनेतून विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या या कृतीतून सामाजिक एकोपा आणि परोपकाराचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण बाळासाहेब शिर्के, स्नेहालय संस्थेचे विकास सुतार, सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड, उपाध्यापक प्रशांत दिघे, पावडे अनिता, शारदा तांबे, अर्चना नाईक, कडे विद्या, वाघ सिंधू, हजारे प्रियांका, शितल रोहकले, देवराम भांगरे आणि एकनाथ गुंजाळ यांनी परिश्रम घेतले.

रोलर स्केटिंगमध्ये ओंकार गोरे याला रौप्यपदक

पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली निवड

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

पुणे विभागीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचा खेळाडू ओंकार राजू गोरे याने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. या यशामुळे त्याची पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित पुणे विभागीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा २०२६ मध्ये ओंकारने आपल्या कौशल्याची छाप पाडत रौप्यपदकाची कमाई केली. त्याच्या या यशाबद्दल तालुक्यातून त्याचे कौतुक होत आहे.

ओंकारच्या यशाबद्दल श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांनी



अभिनंदन केले. तसेच जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे, नागवडे कारखान्याच्या उपाध्यक्षा मेघनाताई औटी, कारखान्याचे सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उपप्राचार्य चंद्रभान कातोरे, पर्यवेक्षक प्रवीण टकले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

ओंकारला महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. सतीश चोरमले, डॉ. महेश गिरमकर, जयेश आनंदकर तसेच त्याचे वडील व माजी उपनगराध्यक्ष राजू गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

वनकुटे ग्रामपंचायतीतील लिपिक नियुक्तीवरून वाद

सरपंच, उपसरपंच व सदस्यांवर कारवाईची लिपिक रामदास खामकर यांची मागणी

● **पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्यातील वनकुटे ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये लिपिक पदावरील नियुक्ती आणि पद रिक्त दाखविण्याच्या निर्णयावरून वाद निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीचे लिपिक रामदास लक्ष्मण खामकर यांनी सरपंच, उपसरपंच व संबंधित सदस्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ६१ चे उल्लंघन करून मनमानी ठराव मंजूर केल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज सादर करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

खामकर यांनी दिलेल्या अर्जानुसार, ते सन २००१ पासून वनकुटे ग्रामपंचायतीमध्ये वसुली लिपिक म्हणून कार्यरत आहेत. दि. २९ डिसेंबर २०२३ रोजी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ठराव घेऊन त्यांना पदोन्नतीने लिपिक पदावर नियुक्त करण्यात



आले होते.

या पदासाठीचे वेतनही जिल्हा परिषदेकडून त्यांच्या खात्यात जमा झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मात्र, दि. २० जुलै २०२६ रोजीच्या ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक १७ नुसार लिपिक पद पुन्हा रिक्त दाखविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी लिपिक पदाच्या भरतीसाठी जाहिरात देण्यात आली, तर दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सरपंचांनी त्यांना पूर्वीच्या पदावर पाठविण्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना पत्र दिल्याचे अर्जात म्हटले आहे.

ही संपूर्ण प्रक्रिया राजकीय वैमनस्यातून करण्यात आल्याचा दावा खामकर यांनी केला आहे. कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता किंवा चौकशी न करता निर्णय घेण्यात आल्याने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी मासिक सभेत संबंधित ठराव मांडून मंजूर करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.या प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ३९ नुसार सरपंच, उपसरपंच आणि ठरावाच्या वेळी उपस्थित असलेल्या संबंधित सदस्यांवर कारवाई करावी, तसेच वादग्रस्त ठराव रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आठ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास कामगार न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही खामकर यांनी दिला आहे.

राहाता तालुका प्रीमियर लीगमध्ये विखे पाटलांची फलंदाजी!

जनतेच्या सेवेत सदैव तत्पर । क्रिकेटच्या मैदानात उतरून पालकमंत्र्यांनी घेतला खेळाचा आनंद



● **राहाता । वीरभूमी–**

जनतेच्या प्रश्नासाठी दिवसरात्र धावपळ, विकासकामांचा व्याप आणि विविध जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असतानाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी क्रिकेटच्या मैदानात उतरून फलंदाजीचा आनंद घेतला. राहाता (पिंपळस) येथे सुरू झालेल्या राहाता तालुका प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी स्वतः मैदानात उतरून क्रिकेट खेळले.

जनतेच्या सेवेत सदैव तत्पर असलेले विखे पाटील मैदानात उतरताच पुन्हा एकदा खेळाडूच्या भूमिकेत दिसले. राजकीय आणि विकासकामांच्या धावपळीतून वेळ काढत त्यांनी क्रिकेटच्या माध्यमातून खेळाचा आनंद अनुभवला.

फलंदाजी करताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. हा क्षण केवळ क्रिकेटचा आनंद घेणारा नव्हता, तर व्यस्त दिनचर्येतून वेळ काढून आवडीच्या गोष्टींसाठी आनंदाचे क्षण अनुभवण्याची सुंदर झलक ठरला. राहाता तालुका प्रीमियर लीगच्या उद्घाटनाला त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेच्या उत्साहात भर पडली.